आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१२ मे २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठी उद्या मतदान /राज्यातल्या ११ मतदारसंघांमधे मतदानासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज

- आपल्या सरकारनं गेल्या दहा वर्षात गरिबांचं सक्षमीकरण आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर भर दिल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- ही लोकसभा निवडणूक लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी असल्याचं काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचं मत

**आणि**

- राज्याच्या काही भागात अवकाळी पावसाची हजेरी /येत्या दोन दिवसांत कोकणात तुरळक ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातलं मतदान उद्या होणार असून यात नऊ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून ९६ मतदारसंघांचा समावेश आहे. राज्यात पुणे, शिरुर, मावळ, अहमदनगर, शिर्डी, नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद आणि बीड इथं उद्या मतदान होणार आहे. राज्यात या टप्प्यात एकूण २९८ उमेदवार नशीब आजमावत आहेत. मतदानासाठी राज्यातली निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. चौथ्या टप्प्यातल्या मतदानासाठी मतदान केंद्रस्तरीय कर्मचाऱ्यांना आज साहित्याचं सकाळी वाटप करण्यात आलं. या टप्प्यात ११ लोकसभा

मतदारसंघातल्या एकूण २९ हजार २८४ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. त्यासाठी निवडणूक आयोगानं, राज्यात एकूण ५३ हजार ९५९ बॅलेट युनिट, २३ हजार २८४ कंट्रोल युनिट आणि तितकीच व्हीव्हीपॅट मशीन उपलब्ध करून दिली असल्याची माहिती राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली. निवडणूक सुरळीत पार पाडण्यासाठी पुरेसे प्रशिक्षित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह पोलीस कर्मचारी तैनात केले असल्याचंही निवडणूक कार्यालयानं कळवलं आहे.

मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या शंभर मीटरच्या परिसरात मोबाईल फोन बाळगण्याला बंदी घातली असून, नियम मोडणाऱ्यांविरोधात कारवाई करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनांनी जारी केले आहेत.

**<><><><><>**

मतदान केंद्रावर पार पाडण्याची महत्वपूर्ण कामं वारंवार निर्दशनाला यावीत यासाठी जालन्याच्या जिल्हाधिकाऱ्यानी अभिनव संकल्पना राववली आहे. त्याविषयी ऐकूया आमच्या वार्ताहराकडून…

**होल्ड (व्हाईस कास्ट)…..जालना पीटीसी**

**<><><><><>**

आपल्या सरकारनं गेल्या दहा वर्षांमध्ये गरिबांना सक्षम करण्यावर तसंच त्यांच्यासाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर भर दिल्याचं प्रधानमंत्री आणि वरिष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रत्येक नागरिकाला सक्षम केल्यानं आणि त्यांना यशस्वी होण्यासाठी लागणारी साधनं उपलब्ध करून दिल्यानं खराखुरा विकास घडून येतो, हे भारतानं जगाला दाखवून दिलं आहे, असं त्यांनी एका इंग्रजी दैनिकाला

दिलेल्या मुलाखतीत सांगितलं. गेल्या दहा वर्षात २५ कोटी जनता गरिबीतून बाहेर आल्याचं ते म्हणाले.

भारतातलं बेरोजगारांचं प्रमाण जगात सर्वात कमी असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. कोट्यवधी नागरिकांनी स्वतःचा व्यवसाय सुरु करण्यासाठी मुद्रा कर्जाचा लाभ घेतला, हे पहिल्यांदाच घडलं आहे. आपल्या सरकारनं मजबूत अर्थव्यवस्था उभारली असून त्यामुळे भारताच्या आगामी २५ वर्षांचा पाया घडला आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><>**

सध्या देशात सुरु असलेली लोकसभा निवडणूक लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी आहे असं काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी म्हटलं आहे. खर्गे यांनी आज धुळ्यात शिंदखेडा इथे महाविकास आघाडीच्या उमेदवार डॉक्टर शोभा बच्छाव यांच्या प्रचारासाठी सभा घेतली त्यावेळी ते बोलत होते.

भाजपा आणि आरएसएसचे लोक संविधान नष्ट करण्यासाठी ही निवडणूक लढवत आहेत, आपल्याला प्रचंड बहुमत मिळालं तर आपण संविधान बदलू असं त्यांचे लोक म्हणत आहेत असा आरोपही त्यांनी केला. त्यामुळेच ही देशाच्या भवितव्यासाठीची निवडणूक असून, बाबासाहेबांनी बनवलेल्या संविधानाचं रक्षण आपल्याला करायचं हे लक्षात ठेवून मतदान करावं, असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><>**

ही निवडणूक साधारण निवडणूक नसून भारताचा आत्मा सुरक्षित ठेवण्यासाठीचा संघर्ष आहे. भाजपानं लोकशाही, संविधान धोक्यात आणलं आहे, विविधतेला खुलेआमपणे छेद दिला आहे, असा आरोप काँग्रेसचे वरिष्ठ नेते, माजी केंद्रीय मंत्री शशी थरूर यांनी आज केला. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. जनतेचे ज्वलंत

प्रश्न टाळून बिनमहत्वाच्या मुद्द्यावरच भाजपा आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बोलत आहेत, अशी टीका त्यांनी केली.

महाराष्ट्रात महाविकास आघाडीतल्या पक्षांमध्ये योग्य समन्वय असल्याची पावती थरूर यांनी दिली. ४ जूनला दिल्लीतून भाजपाचं सरकार जाऊन इंडिया आघाडीचं सरकार येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

राज्याच्या काही भागात आज अवकाळी पावसानं हजेरी लावली.

**नांदेड** शहरासह जिल्ह्याच्या विविध भागात आज संध्याकाळी वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडला. या पावसामुळे फळबागांसह काढणीला आलेल्या ज्वारीचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं. हवामान विभागानं नांदेड जिल्ह्याला मंगळवारपर्यंत यलो अलर्ट दिला आहे.

**नाशिक** जिल्ह्यातही गेल्या २ दिवसांपासून अवकाळी पाऊस कोसळत आहे. या पावसामुळे अनेक घरांची पडझड झाली असून काही ठिकाणी जनावरं दगावली आहेत. जिल्ह्यात वीज कोसळल्यानं एका महिलेचा तर मृत्यू झाला तर घराची भिंत कोसळल्यानं एक महिला जखमी झाली.

**सोलापूर** शहर आणि जिल्ह्यात आज दिवसभर ढगाळ वातावरण होतं, संध्याकाळी काही ठिकाणी हलका पाऊस पडला. काल झालेल्या पावसानं जिल्ह्याचं तापमान सुमारे सहा ते सात अंशानी घसरून लोकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला. या अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातल्या आंबा आणि डाळिंब बागांचं मोठं नुकसान झालं आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्याच्या प्रचारासाठी भाजपा नेते अमित शाह उद्या वसईत येत आहेत. पालघर लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार डॉ. हेमंत विष्णु सावरा यांच्यासाठी ते प्रचारसभा घेतील. वसईतल्या सनसिटी मैदानावर दुपारनंतर त्यांची सभा होईल, असं भाजपाचे वसई विरारचे प्रचार प्रमुख मनोज बारोट यांनी सांगितलं.

<><><><><>

नाशिकमधले काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष डॉ. तुषार शेवाळे यांना काँग्रेसनं पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित केलं आहे. यासंदर्भातलं पत्रक आज प्रदेश काँग्रेसनं जारी केलं. लोकसभा निवडणुकीच्या काळात ते पक्षविरोधी काम करत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, या कारणानं, त्यांना पक्षातून निलंबित केल्याचं या पत्रकात म्हटलं आहे.

दरम्यान तुषार शेवाळे यांनी आज धुळे इथं भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला.

<><><><><>

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण ‘उत्तर मुंबई ’ लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

धुळे जिल्ह्यातल्या शिरपूर तालुक्यात पाच गावठी पिस्तूल आणि अकरा जिवंत काडतूस पोलिसांनी जप्त केले आहेत. पिस्तूल घेऊन जाणाऱ्या दोघांना पोलिसांनी

ताब्यात घेतलं आहे. ही शस्त्रं मध्यप्रदेशातून आणल्याचं आरोपींनी सांगितलं. रामभाऊ मिसाळ आणि परमेश्वर मिसाळ अशी आरोपींची नावं आहेत.

<><><><><>

जागतिक परिचारिका दिवस आज सर्वत्र साजरा होत आहे. राज्यात छत्रपती संभाजीनगरातल्या घाटी रुग्णालयात परिचारिका दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. तसंच हिंगोलीत शासकीय नर्सिंग महाविद्यालय आणि नांदेड जिल्ह्यातल्या भोकर ग्रामीण रुग्णालयातही परिचारिका दिवस साजरा झाला. या वेळी अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येनं उपस्थित होते. आद्य परिचारिका फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांच्या जन्मदिवसांचं औचित्य साधत परिचारिका दिवस साजरा केला जातो. इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ नर्सेननं १९६५ साली हा दिवस साजरा करायला सुरुवात केली होती.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत कोकणात तुरळक ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र , मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान शास्त्र विभागानं व्यक्त केली आहे. या काळात या ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे.

<><><><><>

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज दुपारी चेन्नई सूपर किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात झालेल्या सामन्यात चेन्नईनं राजस्थानचा ५ गडी राखून पराभव केला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना राजस्थान रॉयल्सला निर्धारीत २० षटकांत ५ बाद १४१ धावांचीच मजल मारता आली. त्यानंतर विजयासाठीचं १४२ धावांचं आव्हान चेन्नईनं १८ षटकं आणि २ चेंडूंतच पूर्ण केलं.

स्पर्धेत आता थोड्याच वेळात म्हणजेच साडेसात वाजता रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरु आणि दिल्ली कॅपीटल्स यांच्यात सामना होणार आहे. बंगळुरु इथं होत असलेल्या या सामन्यात दिल्लीनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

//<><><><><>//